## MAHARASHTRA ACT No. XLVI OF 1972

## THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS (POSTPONEMENT OF ELECTIONS DUE TO SCARCITY CONDITIONS IN THE STATE) ACT, 1972

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १६ डिसेंबर १९७२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. बलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLVI OF 1972

## AN ACT TO PROVIDE FOR THE POSTPONEMENT OF ELECTIONS TO CERTAIN MUNICIPAL COUNCILS BECAUSE OF WIDESPREAD SCARCITY CONDITIONS IN THE STATE

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक, २१ डिसेंबर १९७२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

## सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६

### राज्यात सर्वदूर असलेल्या टंचाईच्या परिस्थितीमुळे विवक्षित नगरपालिकांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, डिसेंबर १९७२ मध्ये २१४ पेक्षा कमी नाहीत इतक्या नगरपालिकांच्या निवडणुका घेण्यात यावयाच्या होत्या आणि त्यांचे सर्व प्रारंभिक टप्पे म्हणजेच मतदारसंघांना, निवडन देण्यास सांगणे, नामनिर्देशनांसाठी तारखा निश्चित करणे इत्यादींसाठी मतदारसंघांना सूचना देणाऱ्या अधिसूचना लवकरच काढण्यात यावयाच्या होत्या;

आणि ज्याअर्थी, राज्याच्या बहुतांश जिल्ह्यात सर्वदूर असलेल्या टंचाईच्या परिस्थितीमुळे, उक्त सार्वत्रिक निवडणुका घेण्यासाठी ज्यांची आवश्यकता आहे असे जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व त्यांचा कर्मचारीवर्ग यांना, टंचाईनिवारणविषयक कामे आणि शासनाची रब्बी पीक मोहीम याकरिता आपली सर्व शक्ती लावणे आवश्यक होते आणि परिणामी ते निवडणूक कामासाठी उपलब्ध होऊ शकत नव्हते; तसेच या गंभीर परिस्थितीत अशा अनेक निवडणुका घेणे सामान्य जनतेसही गैरसोयीचे होते;

आणि ज्याअर्थी, या आणि इतर कारणांसाठी राज्यातील नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका तसेच पोट-निवडणुका, विवक्षित मुदतीसाठी, लांबणीवर टाकणे इष्ट होते;

आणि ज्याअर्थी, (निवडणुका) अशा रीतीने लांबणीवर टाकल्याच्या परिणामी, काही प्रशासकांचा पदावधी वाढविणे आवश्यक होते;

आणि ज्याअर्थी राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त सार्वत्रिक आणि इतर निवडणुका लांबणीवर टाकणे आणि उपरोक्त प्रशासकांचा पदावधी वाढविणे, आणि तत्संबंधी इतर गोष्टी यांची तरतूद करण्यासाठी त्वरित कार्यवाही करणे, ज्यामुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, दिनांक २ नोव्हेंबर १९७२ रोजी, महाराष्ट्र नगरपालिका (राज्यातील टंचाईच्या परिस्थितीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७२ प्रख्यापित केला;

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेले विवक्षित फेरबदल करून, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे आवश्यक आहे;

ज्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ आणि कालावधि.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपालिका (राज्यातील टंचाईच्या परिस्थितीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल.

(२) तो २ नोव्हेंबर १९७२ रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

(३) तो दिनांक ३१ डिसेंबर १९७३ हा दिवस धरून, त्या दिवसापर्यंत किंवा राज्य शासनाकडून **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल अशा अगोदरच्या तारखेपर्यंत, अंमलात राहील आणि त्यानंतर तो समाप्त होईल. मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे, या अधिनियमाच्या समाप्तीनंतर जणू काही हा अधिनियम महाराष्ट्र अधिनियमाद्वारे रद्द करण्यात आला असल्याप्रमाणे लागू होईल.

व्याख्या.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "नगरपालिका" आणि "निवडणूक" यांना नगरपालिका अधिनियमात जे अर्थ नेमून दिले असतील तेच अर्थ असतील;

(ब) "नगरपालिका अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५.

विवक्षित नगरपालिकांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे.

३. नगरपालिका अधिनियम किंवा तदन्वये करण्यात आलेले कोणतेही नियम, आदेश आणि उपविधी यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत, कोणत्याही नगरपालिकेची कोणतीही सार्वत्रिक निवडणूक आणि कोणत्याही नगरपालिकेतील कोणतीही तात्पुरती रिकामी झालेली जागा भरण्यासाठी कोणतीही पोट-निवडणूक घेण्यात येणार नाही आणि अशा कोणत्याही निवडणुका घेण्यासाठी कोणतेही उपाय योजण्यात येणार नाहीत आणि कोणताही नवीन सभासद, स्वीकृत किंवा नामनिर्देशित करण्यात येणार नाही;

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस पदावर असलेल्या (आणि हा अधिनियम प्रवर्तनात असताना कोणत्याही वेळी उक्त तारखेनंतर ज्यांचा पदावधी समाप्त होईल अशा) अशा कोणत्याही नगरपालिकेच्या सभासदांचा पदावधी, हा अधिनियम प्रवर्तनात असेल त्या कालावधीकरिता वाढविण्यात आल्याचे समजण्यात येईल;

(क) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस पदावर असलेल्या, नगरपालिका अधिनियमाच्या कलम ३१६, खंड (ब) अन्वये राज्य शासनाने नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीचा किंवा व्यक्तींचा पदावधी हा अधिनियम प्रवर्तनात असेल त्या मुदतीत वाढविण्यात आल्याचे समजण्यात येईल ;

(ड) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस पदावर असलेल्या किंवा अशा प्रारंभाच्या तारखेनंतर ज्याची नियुक्ती करता येईल (आणि हा अधिनियम अंमलात असलेल्या कालावधीत ज्याचा पदावधी किंवा वाढविण्यात आलेला पदावधी संपत असेल) अशा, नगरपालिका अधिनियमाच्या कलम ३१३ अन्वये नेमण्यात आलेल्या कोणत्याही नगरपालिकेच्या प्रशासकाचा पदावधी किंवा वाढविण्यात आलेला पदावधी हा, हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीपर्यंत वाढविण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

विद्यमान सभासद, प्रशासक इत्यादींचा पदावधी संपण्यापूर्वी नवीन नगरपालिकांची रचना करण्याची व्यवस्था करणे.

४. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, राज्य शासनाने, शासकीय राजपत्रात अधिसूचित करावयाच्या तारखेनंतर (ही तारीख हा अधिनियम समाप्त होण्यापूर्वीची तारीख असेल), हा अधिनियम अंमलात असताना विद्यमान सभासद, उक्त अधिनियमाच्या कलम ३१६ खंड (ब) अन्वये नेमलेल्या व्यक्ती व प्रशासक यांचा वाढविण्यात आलेला पदावधी समाप्त होण्यापूर्वी, नगरपालिका अधिनियम व तदन्वये करण्यात आलेले नियम, आदेश व उपविधी यांच्या उपबंधांस अनुसरून नवीन नगरपालिकांची रचना करण्याची व्यवस्था, संचालक, नगरपालिका प्रशासन, जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि इतर संबंधित अधिकारी, यांजकडून करण्यात येईल.

नगरपालिका अधिनियम लागू करणे.

५. ह्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा उपबंधित असेल त्या शिवाय, नगरपालिका अधिनियम हा, संबंधित नगरपालिकांना, इतर सर्व बाबतीत लागू होईल.

अडचणी दूर करणे.

६. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्भवेल तर, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, आदेशाद्वारे अशी अडचण निवारण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक असल्याचे दिसून येईल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

सन १९७२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक बारा रद्द करणे व व्यावृत्ती.

७. (१) महाराष्ट्र नगरपालिका (राज्यातील टंचाईच्या परिस्थितीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७२ हा याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने रद्द करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये केलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)
न. ब. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.